डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१
दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६०० / २६३३३३३० /२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in

जा.क्र : बार्टी/सीव्हीसी विभाग/कार्या-१४/२०२५-२६/ ४९५२ दिनांक- २७/६/२५

# जाहीर आवाहन

**विषय: जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी प्रक्रीयेबाबत**

महाराष्ट्र अनु. जाती, अनु. जमाती, विजाभज, इमाव व विमाप्र (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० (२००१ चा महाराष्ट्र क्र.२३) व त्या अंतर्गत नियम २०१२ अन्वये जात वैधता प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्जदारांमार्फत संबंधीत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे सादर केला जातो.

याकरीता संबंधीत समितीमार्फत प्रस्तावासोबत आवश्यक दस्तावेज व पुरावे इ. स्वरुपात जोडलेले आहेत अथवा प्रस्ताव अपूर्ण आहे याची खात्री करुन संबंधीत अर्जदारास अधिकचे पुरावे प्रस्तावासोबत सादर करणेबाबत मार्गदर्शन करण्यात येते.

तसेच अर्जदारांच्या सोईसुविधेकरिता डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे मार्फत ऑनलाईन पोर्टल विकसित केले असून त्यामध्ये पुढील प्रमाणे सोईसुविधा उपलब्ध आहेत.

१. ०१ ऑगस्ट, २०२० पासून जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज प्रक्रिया ऑनलाईन करण्यात आली. ज्यामध्ये अर्जदारांना अर्ज डाऊनलोड करण्यासाठी, सादर केलेला अर्ज ट्रॅक करणे, त्रुटींची ऑनलाईन पुर्तता करणे, वैधता प्रमाणपत्र ऑनलाईन मिळणे. इत्यादीं बाबींची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.
२. अर्जदारांना ऑनलाईन पद्धतीने सेवा शुल्क भरण्यासाठी दिनांक १२ डिसेंबर २०२० पासून पेमेंट गेटवे ची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.
३. जात वैधता प्रमाणपत्र डिजीलॉकरच्या (Digi-locker) माध्यमातून अर्जदार कुठेही कधीही मोबाईलवर पाहू शकतो.
४. समित्यांकडून निकाली काढलेले वैध प्रमाणपत्र ई-मेल द्वारे अर्जदारास प्राप्त होण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.
५. अर्ज भरताना अर्जदारांना सचित्र मदत / मार्गदर्शन आणि सर्मर्पित हेल्पडेस्कची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.
६. **टोल फ्री क्रमांक(२४*७) CM Helpline Toll Free Number : १८०० १२० ८०४०** Help Line वर सुरु आहे.

७. Help Desk - **Whats App Complaint Number: ९४०४९९९४५२**

८. Help Desk -**ईमेल आयडी-helpdesk@barti.in**

९. सर्व जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांकडे प्रलंबित अर्जांवर विद्यार्थ्यांना त्रुटी पूर्तता करण्याबाबत SMS/ Email/ पत्राव्दारे संबंधित समित्यांमार्फत कळविण्यात येते.

उपरोक्तप्रमाणे सोईसुविधा दिल्या आहेत तरीही सर्व जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांकडे प्रलंबित अर्जांवर विद्यार्थ्यांना त्रुटी पूर्तता करण्याबाबत SMS/ Email/ पत्राव्दारे संबंधित समित्यांमार्फत कळविण्यात येऊनही अनेक अर्जदार/विद्यार्थी व पालकांनी संबंधीत समित्यांशी संपर्क साधलेला दिसून येत नाही. महाराष्ट्र अनु. जाती, अनु. जमाती, विजाभज, इमाव व विमाप्र (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० (२००१ चा महाराष्ट्र क्र.२३) व त्या अंतर्गत नियम २०१२ अन्वये, सदर अर्जावरील त्रुटी पूर्तता करण्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी अर्जदारांची आहे. तरी संबंधीत अर्जदार/पालक यांनी त्रुटींची पूर्तता करण्यासाठी व्यक्तीश: संबंधीत समितीशी त्वरीत संपर्क साधावा व त्रुटींची पूर्तता करावी जेणेकरुन समितीला विहित वेळेत निर्णय घेता येईल असे आवाहन **मा.ना.श्री.संजय शिरसाट, मंत्री, सामाजिक न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई व मा. डॉ.हर्षदीप कांबळे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई** यांच्या मार्फत करण्यात येत आहे.

Sunil Ware

(सुनील वारे)
**महासंचालक**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन**
**व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे तथा मुख्य समन्वयक,**
**जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या (सर्व),**
**महाराष्ट्र राज्य.**